नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५९ Issue - 259 | वार बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ Blow- Wednesday Date 5 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## दहावी, बारावीच्या परीक्षेवर ड्रोनची नजर

### कॉपीमुक्त अभियानाच्या कठोर अंमलबजावणीचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फ ेब्रुवारी-मार्च दरम्यान होणाऱ्या इयत्ता १२ वी आणि १०वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी प्रकरणास पूर्णत: प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान कठोरपणे राबविण्याचे आदेश मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले. गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख ठेवण्यात येणार आहे.



राज्यात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च आणि माध्यमिक शालांत प्रम ाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव सौनिक यांनी आढावा घेतला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल या वेळी उपस्थित होते. शालेय शिक्षण आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरचित्र संवाद माध्यम ातून सहभागी झाले.

परीक्षांच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख करण्यात यावी.

परीक्षा केंद्रांबाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात यावे.

परीक्षा सुरू होण्याआधी एक दिवस परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री करावी.

सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके, बैठी पथके उपलब्ध करावीत.

जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित सर्व घटकांची 'चेहरा पडताळणी व्यवस्थे'(फेस रेकग्निशन) तपासणी करण्यात येणार आहे. तसेच संबंधितांना स्वतंत्र ओळखपत्र देण्यात येणार आहे.

गैरप्रकार घडल्यास गुन्हा दाखल

परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास त्याला उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर दखलपात्र, अजामीनपात्र गुन्हा दाखल करावा. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात यावीत. परीक्षा केंद्रांच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

## सहकार निवडणूक प्राधिकरणाला आयोगाचा दर्जा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील लाखो सहकारी संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सहकार निवडणूक प्राधिकरणास आता राज्य निवडणूक आयोगाच्या धर्तीवर निवडणूक आयोगाचा दर्जा देण्यात येणार आहे. देशातील अन्य राज्ये तसेच उच्च न्यायालयाच्या आद- ेशानुसार प्राधिकरणाला आयोगाचा दर्जा देण्यात येणार असला तरी या आयोगास संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत मात्र सरकारमध्येच मतभिन्नता आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सरकारने ९७ व्या घटनादुरुस्तीच्या आधारे २०१३ मध्ये राज्यात सहकार निवडणूक प्राधिकरण स्थापन केले. राज्यातील साखर कारखाने, सूत गिरण्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, बाजार समित्या, २५० पेक्षा अधिक सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था अशा एक लाख सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडणे व म तदार याद्या यांचे अधिक्षण, निर्देशन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर सोपविण्यात आली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण ही एक स्वायत्त, स्वतंत्र आणि नि:पक्षपाती प्राधिकरण असून त्यांना स्वायत्तता देण्याबाबत उच्च न्यायालयाने २०१५मध्ये स्पष्ट आदेश दिले असतानाही या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा व संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत सरकारदरबारी गेल्या १० वर्षांपासून चालढकल सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आता या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा देण्याबाबतच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यात येणार असून विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यात सध्या विविध प्रकारची प्राधिकरणे असून ती शासनाच्या मालकीची किंवा सरकारच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत. सहकार निवडणूक प्राधिकरण स्वायत्त असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात राज्य सरकार अनेक वेळा सहकार कायद्यातील 'कलम ७३ क'चा वापर करून निवडणुका स्थगित करणे, पुढे ढकलण्याचा निर्णय घेत असते.

## महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटींची तरतूद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात २३ हजार ७७८ कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.



यापूर्वी २००९-१४ या काळात महाराष्ट्राला वर्षाला सरासरी १ हजार १८१ कोटी रुपये मिळायचे. यंदा एकाच वर्षातील तरतूद ही तब्बल २० पटींनी अधिक आहे. २०१४ ते २०२५ या दरम्यान राज्यात दरवर्षी सरासरी १९१ किलोमीटर्सचे नवे रेल्वे मार्ग विकसित केले गेले आहेत. हे प्रमाण यापूर्वीच केवळ दरवर्षी सरासरी ५८ किलोमीटर इतके होते. २००९-१४ या कालावधीत एकाही मार्गाचे विद्युतीकरण झाले नव्हते. त्यानंतर २०१४ ते २०२५ या काळात दरवर्षी सरासरी ३२६ किलोमीटर्स मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले यामुळे महाराष्ट्रातील ३ हजार ५८६ म्हणजेच पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे.याच कालावधीत महाराष्ट्रात २ हजार १०५ किलो मीटर्सचे नवे रेल्वे मार्ग बांधण्यात आले. तुलनाच करायची झाल्यास ही लांबी मलेशियातील आता अस्तित्वात असलेल्या संपूर्ण रेल्वे मार्गाच्या लांबी इतकी होते.

महाराष्ट्रात सध्या १ लाख ५८ हजार ८६६ कोटी रूपयांचे ४७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. यातून ६ हजार ९८५ किलोमीटर मार्गाची बांधणी सुरू आहे. यामध्ये बुलेट ट्रेनसह केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या 'डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर- डिएफसी' चार महत्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश आहे. राज्यात ५ हजार ५८७ कोटी रुपयांच्या तरतुदीतून १३२ अमृत रेल्वेस्थानकांची निर्मिती केली जात आहे.

रेल्वेची कवच सुरक्षा प्रणाली ४ हजार ३३९ मार्ग अंतरासाठी कार्यान्वीत केली जाणार आहे. यातील सध्या ५७६ किमीसाठीची यंत्रणा कार्यान्वीत आहे. राज्यभरात २०१४ पासून आतापर्यंत विविध ठिकाणी १ हजार ६२ रेल्वे उड्डाण मार्ग, भुयारी मार्ग (आरएफओबी, आरयुबी) बांधण्यात आली आ- हेत. याशिवाय २३६ ठिकाणी लिफ्ट, ३०२ एस्कलेटर्स बसविण्यात आले आहेत. तसेच ५६६ रेल्वे स्थानकांवर वायफाय सुविधा उपलब्ध दिली आहे. याशिवाय राज्यातील ११ जिल्ह्यांसाठी उपयुक्त ठरतील अशा ११ वंदे भारत रेल्वेगाड्या सुरू करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राच्या आतापर्यंतच्या वाटचालीत रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्व अशी वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आ- हेत. माल वाहतूक सुविधा सहज सुलभ आणि मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. या सगळ्यातून महाराष्ट्र हे रेल्वेच्या नकाशावरील सशक्त आणि सदृढ राज्य बनले आहे.

## आम्ही संविधान जगणारे लोक आहोत : पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत जोरदार भाषण करत विरोधकांची पिसं काढण्याचं काम केलं. हा देश संविधानानुसारच चालणार, आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं स्वप्न पूर्ण होऊ देणार नाही असं लोकसभेचे विरोधी पक्ष- नेते राहुल गांधी यांनी म्हटलं होतं. या त्यांच्या टीकेला आज पंतप्रधान नरेंद्र म ोदींनी आपल्या खास शैलीत उत्तर दिलं. आम्ही संविधान जगणारे लोक आहोत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. निवडणुकीच्या वेळी काही पक्ष आम्ही हे करु ते करु अशी आश्वासनं देतात मात्र ती पूर्ण करत नाहीत. आमचं धोरण असं नाही. आम्ही जे आश्वासन देतो ते पूर्ण करतो. संविधानाला बळकटी देण्यासाठी आम्ही संविधान जगण्याचं काम करत आहोत. मी त्याची काही उदाहरणं देऊ इच्छितो, आम्ही संविधान जगणारे लोक आहोत. आपल्याकडे ही परंपरा आहे की राष्ट्रपती जेव्हा अभिभाषण करतात तेव्हा त्या देशात काय काय कार्य झालं ते सांगतात. संविधान आणि लोकशाहीचं स्पिरिट काय असतं ? गुजरातला जेव्हा ५० वर्षे पूर्ण झाली तेव्हा मी गुजरातचा मुख्यमंत्री होतो, त्यावेळी आम्ही ठरवलं की मागच्या ५० वर्षांत सदनात जेवढी राज्यपालांची भाषणं झाली ती भाषणं त्याचं पुस्तक तयार केलं.

## लोकसभेत महाराष्ट्रात पीक विमा घोटाळ्यावरून कृषिमंत्र्यांना विचारणा?; दोषींवर कारवाई करू : कृषीमंत्री चौहान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला ३१ जानेवारीला सुरुवात झाली आहे. त्यानंतर आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रातील पीक विमा घोटाळ्याचा मुद्दा उप- स्थित केला होता. यानंतर केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या प्रकरणी चौकशी करून जर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे आश्वासन सुप्रिया सुळे यांना दिले. दरम्यान गेल्या दोन महिन्यांपासून राज्यात बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गाजत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी एक आरोपी वगळता सर्वांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळच्या असलेल्या वाल्मिक कराडलाही खंडणी प्रकरणात अटक करण्यात आली आहे. हत्या प्रकरणात वाल्मि क कराडचाही सहभाग असल्याचा आरोप होत आहे. त्याम ुळे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान विरोधी पक्षासह सत्ताधारी पक्षातील नेत्यांनीही महायुती सरकारच्या मागच्या कार्यकाळात कृषी खात्यात घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. महायुतीच्या गेल्या कार्यकाळात धनंजय मुंडे कृषीमंत्री होते.



यावेळी खासदार सुप्रिया सुळे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासमोर प्रश्न उपस्थित करत म्हणाल्या, महाराष्ट्राच्या सध्याच्या कृषीमंत्र्यांनी पीक विमा योजनेत ५०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची कबुली दिली आहे. तर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी तो घोटाळा ५ हजार कोटींचा असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे केंद्रीय कृषीमंत्री म्हणून आपणास याबद्दल माहित होते का? आणि या घोटाळ्याचे चौकशीचे आदेश आपण देणार का? याला उत्तर देताना कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या प्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासन सुप्रिया सुळे यांना दिले आहे.

सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शिवराज सिंह चौहान म्हणाले, हे प्रकरण मी पहिल्यांदाच ऐकत आहे. मला खरी परिस्थिती काय आहे हे माहित नाही. पण जर कुठेही अनियमितता आढळली तर आम्ही चौकशी करू आणि दोषींवर कारवाई करू.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही आज आरोप केला आहे की, मागील महायुती सरकारमध्ये थेट लाभ हस्तांतरण अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसे पाठवण्याऐवजी, उपकरणे आणि खते जास्त किमतीत खरेदी करून शेतकऱ्यांना देण्यात आली. ज्याम ध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाला.

**सामाजिक न्याय विभागाच्या कामकाजाचा आढावा**

**गुणवत्ता नियंत्रण पथक स्थापन करावे; योजनांचा लाभ शंभर टक्के डीबीटीमार्फतच जमा करावा**

# विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा तपासणीसाठी मंत्री, अधिकाऱ्यांनी वसतिगृह, शाळांना अचानक भेटी द्याव्यात : उपमुख्यमंत्री शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सामाजिक न्याय विभागाची वसतीगृहे, शाळांम धील स्वच्छता, विद्यार्थ्यांना देण्यात येणारे भोजन याविषयीची पडताळणी करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्री, सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देऊन पाहणी करावी. त्यासाठी विभागात गुणवत्ता नियंत्रण पथक स्थापन करण्यात यावे. विशेष सहाय्याच्या सर्व योजनांचा लाभ शंभर टक्के थेट बँक खात्यात (डिबीटीद्वारे) जमा होईल याची दक्षता घेण्याचे निर्दे श उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक न्याय विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, म हाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष तथा माजी खासदार आनंदराव अडसूळ, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त ओम प्रकाश बकोरिया, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीम ाळी आदी यावेळी उपस्थित होते.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनांचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, समाजातील तळागाळा- तील घटकांच्या योजनांचा लाभ हा प्रत्येक लाभार्थ्यांना मिळाला पाहिजे. त्यासाठी शासनाकडून निधीची कम तरता भासणार नाही. या योजनांचा लाभ थेट बँक खात्यात जमा होईल यासाठी विभागाने प्रयत्न करावेत. संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना यांचे लाभ देताना शंभर टक्के ते थेट बँक खात्यातच जमा झाले पाहिजे याची दक्षता घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

विभागाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी योजनांची प्रभावी अंम लबजावणी करुन समाजा- तील दुर्बल, वंचित आणि मागासलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणावे. विभागाच्या योजना स्थानिक पातळी- वर सुलभतेने पोहचविण्यावर भर द्यावा. सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोयी- सुविधांम ध्ये सुधारणा करुन विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पध्दतीने शिक्षण घेता यावे यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विशेष प्रयत्न करण्यात यावेत. विभागात गुणवत्ता नियंत्रण पथकाची स्थापना करावी त्यांच्या मार्फत वसतीगृह, शाळांमधील सुविधांच्या गुणवत्तेची पडताळणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. वसतीगृह, शाळा यामधील सुविधा तसेच तेथील साहित्य, बांधकाम याविषयी तक्रार दाखल करण्यासाठी प विकसती करण्याचे निर्देश देखील उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

**सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील वसतीगृहे, शाळा यामध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छता, राहण्याची व्यवस्था, भोजन आदीं- ची गुणवत्ता कशी आहे याच्या पाहणीसाठी अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देणे सुरू करावे. भोजनाचा दर्जा मंत्री, सचिव, अधिकाऱ्यांनी तपासावा, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड करण्यात येऊ नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.**

केंद्र शासन तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची अंमलबजावणी, अस्तित्व- ातील योजनांमध्ये सुधारणा, नव्या योजना सुरू करणे, योजनांच्या अंमलबजावणीमधील अडथळे दूर करणे आदींच्या अनुषंगानेही बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी विभागामार्फत सुरू असलेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

## संपादकीय....

### आयोगाचा दर्जा

राज्यातील लाखो सहकारी संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सहकार निवडणूक प्राधिकरणास आता राज्य निवडणूक आयोगाच्या धर्तीवर निवडणूक आयोगाचा दर्जा देण्यात येणार आहे. देशातील अन्य राज्ये तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्राधिकरणाला आयोगाचा दर्जा देण्यात येणार असला तरी या आयोगास संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत मात्र सरकारमध्येच मतभिन्नता आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सरकारने ९७ व्या घटनादुरुस्तीच्या आधारे २०१३ मध्ये राज्यात सहकार निवडणूक प्राधिकरण स्थापन केले. राज्यातील साखर कारखाने, सूत गिरण्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, बाजार समित्या, २५० पेक्षा अधिक सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था अशा एक लाख सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडणे व मतदार याद्या यांचे अधिक्षण, निर्देशन आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर सोपविण्यात आली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण ही एक स्वायत्त, स्वतंत्र आणि नि:पक्षपाती प्राधिकरण असून त्यांना स्वायत्तता देण्याबाबत उच्च न्यायालयाने २०१५मध्ये स्पष्ट आदेश दिले असतानाही या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा व संपूर्ण स्वायत्तता देण्याबाबत सरकारदरबारी गेल्या १० वर्षांपासून चालढकल सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आता या प्राधिकरणास निवडणूक आयोगाचा दर्जा देण्याबाबतच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यात येणार असून विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबतचे विधेयक मांडण्यात येणार आहे. राज्यात सध्या विविध प्रकारची प्राधिकरणे असून ती शासनाच्या मालकीची किंवा सरकारच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहेत.

# भक्तीसागर (६५ एकर) येथे दिंडीधारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु
# ४ फेब्रुवारीपर्यंत १६५ दिंड्याची नोंदणी : प्रांताधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरा होत आहे. माघ यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत असून, पालखी, दिंडी धारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु आहे. दि. ०४ फेब्रुवारी पर्यंत १६५ दिंड्याची नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

माघ यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्स असून त्यापैकी वापरायोग्य ४५० प्लॉटस आहेत. हे प्लॉटस भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते..भाविकांना



प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर (६५ एकर) येथे प्लॉटसचे वाटप सुरु असून, या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार आहेत. आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार विजय जाधव (मो.क्र. ८२७५२०२१५५), सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच सहाय्यक प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रांताधिकारी श्र‍ी इथापे यांनी केले आहे.

### डॉ आंबेडकर इंग्लीश मिडीयम स्कूलमध्ये दहावी विद्यार्थांचा निरोप संभारंभ संपन्न

# मानवाच्या कल्याणासाठी शिक्षण हे महत्त्वाचा घटक असून शिक्षणापासूनच विद्यार्थांचा सर्वांगिण विकास होते : ढोकळे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

**दहावीच्या विद्यार्थ्यांना दिल्या शुभेच्छा**

शिक्षण हे मानवाच्या जिवनाचा महत्वाचा घटक आहे शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षण समूहाच्या प्रवाहात वाटचाल सुरू करावी कारण शिक्षणामुळे आपले भविष्य उज्ज्वल होते आणि विद्यार्थांचा सर्वांगिण विकास होतो शिक्षणामुळे आपणाला आयुष्यात खुप मोठ्या गोष्टी एकमेकांशी संवाद साधला जातो त्यामुळे शिक्षणाला मानवाच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची गरज आहे त्यासाठी विद्यार्थांनी वेसना पासुन दुर राहीले पाहिजे आसे प्रतिपादन प्राचार्य रामदास ठोकळे यानी केले



नळदुर्ग डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मिडीयम स्कुलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप संभारंभ कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते

प्रथमता बहुजन प्रतिपालक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार घालून पुजन करण्यात आले यावेळी डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मिडीयम स्कुलचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर केसकर बाळासाहेब बागडे भास्कर वाघमारे हे होते

दहावीच्या मुली राधा घोडके , श्वेता सुरवसे , स्नेहा सुर्यवंशी , समीक्षा चव्हाण , नगमा काझी , रितू पाटील आदीनी मनोगत व्यक्त केल्या यावेळी शाळेच्या सर्व दहावीच्या विद्यार्थी विद्यार्थीतीचे गिफ्ट वस्तू देऊन भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या .यावेळी शिवाजी जाधवर जानक गायकवाड , समीना खतीब , वनिता मोहरीर , सलमा शेख, अर्चना जमादार, अर्पिता हंचाटे, अजित प्रसाद, सुरेश राजमाने, घोडके आदिजनानी आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगमा काझी व श्वेता सुरवसे यांनी केले तर शेवटी आभार गायकवाड यांनी मानले.

# हळदी कुंकू व सन्मान नारी शक्तीचा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

स्वच्छ सुंदर परिसर जीवन निरोगी निरंतर ही संकल्पना मनात ठेवून अध्यक्ष स्नेहल देव, नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्यातर्फे हळदी कुंकवाचा वाण म्हणून कचऱ्याची पेटी...




अध्यक्ष स्नेहल देव यांच्या नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक तर्फे आयोजित वाडीवर्हे येथे सौभाग्याचे लेणी हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला .यावेळी आजूबाजूच्या परिसरातील जवळपास दीडशेहून अधिक महिलांनी आपली उपस्थिती दर्शवून हळदीकुंकू समारंभाचा आनंद घेतला. सर्वप्रथम कर्नल मच्छिंद्र शिरसाठ यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करण्यात आले त्यानंतर नमस्ते नाशिक फाउंडेशनचे अध्यक्ष स्नेहल देव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले, स्नेहल देव यांनी स्वच्छ सुंदर परिसर जीवन निरोगी निरंतर ही संकल्पना मनात ठेवून, महिला सशक्तीकरण स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर भर देत सर्व गावातील महिलांना वाणस्वरूपी कचऱ्याची पेटी देण्याचा मनस ठेवला व सर्व महिलांना कचऱ्याची पेटी देण्यात आली .ही वस्तू आपल्याला मिळणार याचा आनंद सर्व महिलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

होतकरू व कष्टकरी महिला ज्या कुटुंब सांभाळून व्यवसाय करतात यांचा विशेष सत्कार करण्यात आला, वृक्ष लावा पावलोपावली तर मिळेल उन्हात सावली ही संकल्पना नमस्ते नाशिक फाउंडेशन राबवत असतो.त्या दृष्टीने गावातील विविध भागात महिलांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, स्नेहल देव फ्रेंड सर्कलच्या सिने अभिनेत्री सुप्रसिद्ध मॉडेल व सेल्फ डिफेन्स ट्रेनर कु. रूपाली पवार, मेकअप आर्टिस्ट आशा महाजन, ज्वेलरी मेकर सौ.भाग्यश्री कदम, सिनियर असोसिएट शीतल राजेंद्र पाटील ,अरिहंत टुर्स ओनर सपना जैन, सौ.प्रतिभा सुर्यवंशी, सौ अलका देव, सौ प्रतिभा कोतकर, मंजिरी घन,बच्छाव मॅडम, सरला जडे, वैशाली पाटकर, ललिता तातार, श्री कोतकर ,श्री सुभाष देव ,हास्य प्रेमी सौ. कविता पवार, स्मिता धासे, सौ अलका येवले, आदी महिलांच्या हस्ते सर्व गावातील महिलांना हळदीकुंकू चे वाण देण्यात आले, यावेळेस कार्यक्रमास इगतपुरी त्र्यंबकेश्वर मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार श्री. हिरामण दादा खोसकर यांचे पुतणे श्री. भास्कर भाऊ खोसकर, वाडीव-हे गावचे मा. सरपंच श्री .रोहिदास भाऊ कातोरे, मा. सरपंच श्री. रावसाहेब आप्पा मा. उपसरपंच श्री. बाणेश्वर आप्पा मालुंजकर, उपसरपंच श्री. प्रवीण भाऊ मालुंजकर, वाडीव. हे विविध कार्यकारी सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन श्री. दत्ताभाऊ कातोरे तटामुक्ती अध्यक्ष श्री.गणपत दिवटे, वाडीव.हे गावचे मा सदस्य श्री. माणिक भाऊ मुतडक, श्री. भीमा तात्या मालुजकर, मा.व्हा चेअरमन श्री. भाऊसाहेब मालुंजकर, श्री. दिगंबर कातोरे, सदस्य श्री. दिलीप मालुजकर, पै. मोहन भाऊ कातोरे, श्री. प्रभाकर रणमाळे, पै. नारायण कातोरे, श्री. शरद आप्पा मालुंजकर, मा. सदस्य श्री. गोविंद चहादु डगळे, मा. सदस्य श्री. रामदास चारोस्कर, मा. सदस्या, अलका गोविंद डगळे, श्री. गणेश मुतडक, मा. सदस्य, राजेश घोटे, श्री. रोहिदास लहांगे, श्री. हरी लहांगे, श्री. सुरेश कोरडे, श्री. अजय डगळे, श्री. किरण डगळे, श्री. हरी चारोस्कर, श्री. एकनाथ लहांगे, श्री. अशोक झोंबाड, जिल्हा परिषद सदस्य गोरख बोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

# समुद्राळ शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रयोगाची राष्ट्रीय स्तरावर निवड

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील समुद्राळ येथील जय स्वामीनारायण विद्यालयातील विद्यार्थी ऋतिक विजयकुमार मडोळे व अभंग अण्णासाहेब बुंदगे यांनी सादर केलेल्या गार्बेज टॉनिक या प्रयोगाची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. अमरावती येथे शिवाजी सायन्स कॉलेजमध्ये ५२ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनात गार्बेज टॉनिक हा प्रयोग सादर करण्यात आला.

हा प्रयोग विशेष गरजा ( दिव्यांग) गटातून सादर केलेला होता. या प्रयोगाची राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. हा प्रयोग यशस्वी होण्यासाठी धाराशिवच्या शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, विज्ञान परिवेक्षक काझी, विस्तार अधिकारी संतोष माळी,गट शिक्षण अधिकारी शिवकुमार बिराजदार, ज़िल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र स्वामी, किशोर पवार, अजित साळुंके, पर्वती माशाळकर,




यांनी मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अंगद नांगणे, मुख्याध्यापक प्रताप कोकाटे, नरसिंग सुरवसे, रविराज जाधव, दत्तात्रय चव्हाण, रेणुका तेलंग, गोपाळ भुरे, आदींच्या वतीने यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक सदाशिव डिगोळे यांचा यांचा सत्कार करण्यात आला.

### बुद्धिष्ट इंडस्ट्रियल असोसिएशनच्या कार्यालयात ८९ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिपादन

# आधुनिक लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्तींचे पालन करावे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व बुद्धिष्ट इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर्स एंड ट्रेडर्स असोसिएशन (बिमाटा) च्या संयुक्त विद्यमाने ३१ जानेवारी २०२५ ला बजाजनगर येथील बिमाटाचे जनसंपर्क कार्यालयात मूकनायक च्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त ८९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपण आपल्या दैनंदिन व्यवहारात, कुटुंबात व समाजात लोकशाही पाळली पाहिजे जेणेकरून इतर त्याचे अनुसरण करू शकतील. आधुनिक लोकशाहीच्या संवर्धनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे बुद्धिष्ट सेमिनरी चालविली पाहिजे. ज्यातून लोकशाहीला तारक मनुष्यबळ निर्माण झाले तर भारताचे संविधानात अंतर्भूत एकजिनसी भारतीय समाज तयार होऊ शकेल. करिता मुक्यांना बोलता यावे म्हणून आपण सर्व प्रतिनिधींना बोलण्याची संधी उपलब्ध दिली आहे. जेणेकरून आपणांस व्यक्त होण्याची सवय लागेल. याची व्याप्ती वाढावी म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे प्रयत्न सातत्याने सुरु आहेत करिता आज दोन कार्यशाळांचे आयोजन केले आहे. तसेच मूकनायक सारखी परिवर्तनवादी वृत्तपत्रे ही काळाची गरज असा लेख लिहिला आहे. ज्याला विविध वर्तमानपत्रानी प्रसिद्धी दिली आहे. आपण ते समजून घ्यावे. ज्यामुळे लोकशाहीला पुरक जनमत तयार होऊ शकेल.

सर्व उद्योजकांनी डॉ. इंद्रजीत आल्टे लिखित अनुसूचित जाती-जमाती आणि आर्थिक सामाजिक न्याय : भ्रम आणि वास्तव. यावर कार्यशाळा आयोजित करून नेमके आपले वास्तव काय आहे? हे जाणून घ्यावे. जेणेकरून औद्योगिक क्षेत्रातील भयानक विषमता लक्षात आली तर आपला हिस्सा मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतेत रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात. हे स्पष्ट करून रक्तपाताशिवाय क्रांतीची अपेक्षा बाळगली होती. या पूर्ततेसाठी आधुनिक लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्तीचे पालन करण्यासाठी ते समजून घ्यावे म्हणून आपण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या २२ डिसेंबर १९५२ च्या संबंधित भाषणावर मूकनायक च्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यशाळा आयोजित केली आहे.

याप्रसंगी उद्योजक मारोती गायकवाड म्हणाले की, सामाजिक बांधिलकी म्हणून अशा कार्यशाळा सर्वांनी आपल्या कंपनीत आयोजित करावे. उद्योजक अनिल सावते म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० ला सुरू करण्यात आलेल्या मूकनायकचे संपादक पदाचा कार्यभार पांडुरंग भटकर यांचेकडे दिला होता. उद्योजक डी. आर. गायकवाड म्हणाले की, सक्षम मानवी संसाधने निर्माण करून संघटन चालविले पाहिजे. उद्योजक बाबासाहेब घाडगे म्हणाले की, इतर समाजाला नाव ठेवण्यापेक्षा आपण काय करतो? याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. विकास रामटेके म्हणाले की, विचार मांडणे ही एक कसोटीच आहे. महादेव डांबरे म्हणाले की, लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी विषमता नष्ट करणे व विरोधी पक्ष मजबूत केला पाहिजे. पूर्वी माणसे गरीब असताना चळवळ श्रीमंत होती, आता माणसे श्रीमंत झाली आणि चळवळ गरीब झाली. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची रक्तपाताशिवाय लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात बदल घडवून आणणारी शासन व्यवस्था व पद्धती म्हणजे लोकशाही अंमलात आणली पाहिजे.

प्रमुख वक्ते प्रा. संजय सांभाळकर म्हणाले की, आज आपण मूकनायकच्या वर्धापनदिनानिमित्त मुक्यांना बोलण्याची संधी दिली ही एक क्रांतीची सुरूवातच आहे. संवादातूनच क्रांती होते. त्या काळात अडाणी लोकांसमोर मूकनायकचे चावडी वाचन केले जात होते. चळवळीच्या चर्चा बंद झाल्याने भारताचे संविधानात अंतर्भूत लोकशाही संपुष्टात आणली जात आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन एड. विलास रामटेके व प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. तर विकास रामटेके यांनी जगभर कीर्ती, या भू वरती हे गीत सादर केले. या कार्यशाळेला संदीप केदारे, प्रमोद राऊत, सी. के. सावते, प्रवीण रणयेवले, मारोती वाघमारे, बी. डी. उमप, संग्राम घाटे, मंदाताई वाघमारे, आशुतोष सावते, सुधाकर वाघमारे, मिलिंद काशिदे, विनोद अवसरमल, अप्पासाहेब साळवे, सुभाष कोसरे, शांतीलाल कानडे, एस. पी. हिवराळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### शेतातून नऊ हजाराची वायर पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : शेतातून नऊ हजार रुपये किमतीची ३०० फूट मोटार कनेक्शनची वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ते २८ जानेवारी दरम्यान बसवेश्वर नगर येथे घडली.याप्रकरणी उमेश भारत जाधव (वय-४७,रा.देगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उपासे हे करीत आहेत.

### घरासमोरून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीएक्स.१९६७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३१ जानेवारी रोजी दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान भवानी पेठ घोंगडे वस्ती येथे घडली.याप्रकरणी व्यंकटेश वसंत तुम्मा (वय-४८,रा.भवानी पेठ,घोंगडे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

### बांधकाम साइटवर येऊ दिले नाही म्हणून साहित्य पळवले

सोलापूर, (प्रतिनिधी) : बांधकाम साइटवर येऊ दिले नाही म्हणून शिवीगाळ करत २ लाख ६४ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना ११ मार्च २०२४ दरम्यान न्यास नोंदणी कार्यालय गुरुनानक चौक येथे घडली. याप्रकरणी भीमराया सेंटप्पा केंचनाळ (वय-६५-,रा.सोलापूर) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून जितेंद्र नडगिरी,अमर फारुख पटेल व इतर साथीदार यांच्याविरुद्ध दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,सुजित मल्लिकार्जुन गायकवाड यांच्या बांधकामावर वॉचमन म्हणून नोकरीस असताना बांधकामावरती सेंट्रींगचे काम करणारे वरील संशयित आरोपी यांना फिर्यादी यांनी साइटवर येऊ दिले नाही म्हणून फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच २ लाख ६४ हजार रुपये किमतीचे १२० किलो स्टील,७० किलो बाइंडिंग वायर व स्काडा मशीन चोरून नेली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.

# अक्कलकोट संस्थान चा इतिहास प्रेरणादायी : डॉ मंजिरी कुलकर्णी

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे जयंती निमित्त व्याख्यान कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : छत्रपती शाहू महाराजांच्या काळात अतुलनीय कामगिरी करून मराठ्यांच्या कार्यास लौकिक प्राप्त करून देणाऱ्या अक्कलकोट संस्थान चा इतिहास प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन कन्या महाविद्यालय मिरज येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ मंजिरी कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभागाने कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त अक्कलकोट संस्थान चा इतिहास या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ कुलकर्णी म्हणाल्या की, छत्रपती शाहू महाराजांची औरंगजेबाच्या कैदेतून मुक्तता झाली. त्यानंतर स्वराज्यात आगमन होताच त्यांनी पारद येथील पहिली लढाई जिंकली या लढाईत सयाजी लोखंडे पाटील शहीद झाले. पहिल्याच लढाई फत्ते झाल्यामुळे सयाजी यांची पुत्र राणोजी त्याचे नामकरण फत्तेसिंह करून त्यास भोसले आडनाव जोडून अक्कलकोटची जहागिरी देण्यात आली. त्यावेळी १०८ गावाची जहागिरी देण्यात आली. त्यावेळी अक्कलकोट परगणा होता. त्याचे उत्पन्न ५५ लाख इतके होते. त्यांनी शाहू महाराजाकडून अनेक मोहिमांमध्ये सहभाग नोंदवला.

पुढे अक्कलकोट संस्थानामध्ये फत्तेसिंह राजे भोसले यांची राणी ताराबाई यांनी संस्थान नावारूपास आणले. ते पहिल्या महायुद्धात सहभागी झाले.

तर विजयसिंह राजे भोसले यांनी दुसऱ्या महायुद्धात देशाकडून अतुलनीय कामगिरी बजावली. त्यावेळी त्यांनी वापरलेली शस्त्रे आजही अक्कलकोटच्या संग्रहालयात उपलब्ध आहेत. त्यांच्या कारकीर्दीत स्वातंत्र्य चळवळ प्रजा परिषदेने सुरू केली.

पुढे विलीनीकरणाच्या कायद्यानुसार अक्कलकोट संस्थान विलीन झाले.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, अक्कलकोट संस्थांनचा इतिहास खूप दुर्लक्षित होता त्यावर संशोधन करून डॉ मंजिरी कुलकर्णी यांनी संस्थानावर ग्रंथ लिहिला आहे. त्यामुळे आता संस्थांनची कामगिरी समाजाला समजेल.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी मानले.




### कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी केले समाज परिवर्तन

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी वंचित अपेक्षित व बहुजन समाजात मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणली त्यामुळे समाज परिवर्तनास गती मिळाली असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले मान्यवरांनी कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना अभिवादन केले.**

### अक्कलकोट संस्थांनचा इतिहास ग्रंथाचे स्वागत होईल

**डॉ मंजिरी कुलकर्णी यांनी प्रकाशित केलेली अक्कलकोट संस्थानचा इतिहास ग्रंथाचे अक्कलकोट कर मंडळी स्वागत करतील भविष्यात तो विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल असे कौतुकास्पद प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर यांनी केले**

# शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी अनिवार्य

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करण्याच्या शासनाच्या सुचना आहेत. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करून घ्यावी असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केले आहे.

लाभार्थ्यांचं ई-केवायसी करण्याकरिता गावोगावी कॅम्प आयोजित केले आहे. या करिता शिधापत्रिकेतील अर्थात कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या नजीकच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष आधार कार्ड दाखवून, अंगठ्याचा ठसा देऊन आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करावयाचे आहे. सदरील प्रक्रिया दिनांक १५ फेब्रुवारीपर्यंत करावयाची असल्याने लाभार्थ्यांनी जवळच्या रास्तभाव धान्य दुकानामध्ये अथवा कॅम्पमध्ये जाऊन आपल्या अंगठ्याचा ठसा व आधार नंबर देऊन ई-केवायसी करावी. ई-केवायसी केले नाही, तर दिनांक १५ फेब्रुवारीनंतर धान्य दिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी, त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी कॅम्प चा लाभ घ्यावा. या संदर्भात सर्व लाभार्थी व रास्तभाव धान्य दुकानदार यांना दिनांक १५ फेब्रुवारीपुर्वी १०० टक्के कामकाज पुर्ण करण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस अन्नदिन साजरा करून लाभार्थ्यांना धान्य वाटप सुरू करावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये दर महिन्याच्या १५ तारखेपुर्वी सर्व लाभार्थ्यांना धान्य वाटप पुर्ण करावे. अशा सक्त सुचना देण्यात येत आहेत. तसेच वन नेशन वन रेशनकार्ड अंतर्गत राज्यातील लाभार्थी नजीकच्या कोणत्याही रास्तभाव दुकानामध्ये जाऊन अन्नधान्याची उचल करीत आहेत. त्या लाभार्थ्यांनी त्याच दुकानामध्ये ई-केवायसी करून घ्यावी. अन्यथा आपल्या गावी रास्तभाव धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी करावी. केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत, असंघटीत कामगार ज्यांच्याकडे अद्याप रेशनकार्ड नाही, अशा कामगारांना प्रचलित निकषानुसार विशेष मोहिम अंतर्गत तातडीने शिधापत्रिका वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत स्थलांतरीत, असंघटीत कामगारांना जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालयामध्ये सुरू आहे. त्यानुसार जया व्यक्तीनी स्वत:चे नाव ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत केलेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारच्या शिधापत्रिकेचा लाभ नाही, अशा व्यक्तींनी आवश्यक त्या कागदपत्रांस जवळच्या तहसिल कार्यालयामध्ये संपर्क करून शिधापत्रिका प्राप्त करून घ्यावी. असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे.

# भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान होय : डॉ. सुरेश वाघमारे

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड) : जगातील सर्वात प्रगत राष्ट्र म्हणून समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतील महिलांना किती तरी वर्ष संघर्ष केल्यानंतर मतदानाचा आधिकार मिळाला .परंतू भारतीय महिलांना व सर्वानचं त्यांचे सर्व मानवी हक्क आणि आधिकार देशाच्या स्वातंत्र्या नंतर पहिल्याचं दिवसा पासून स्वतंत्र्य भारतातच्या संविधानाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी मिळवून दिले. म्हणून भारतिय संविधान हे जगात सर्व शेष्ट मानले जाते. त्यामुळे संविधानाचा सन्मान करणे आपले सर्वांच कर्तव्य आहे.

असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळतील थोर विचारवंत सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.सुरेश वाघमारे ( लातूर )यानी नळदुर्ग ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केल.



परिवर्तन सामाजिक संस्था नळदूर्ग च्या वतीने अपल घर आलियाबाद नळदुर्ग येथे संविधान सन्मान परिषद व विविध क्षेत्रात उलेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना राज्यस्तरिय परिवर्तन पुरस्कार वितरन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी डॉ.सुरेश वाघमारे हे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की सध्या देशात जाणिवपुर्वक संविधानाच्या उद्देशिकेची मोडतोड करून व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करून जातीय तेड निर्माण करून संविधानाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे ही एक चिंतेची बाब असून संविधानाच्या समर्थनार्थ आपण सतर्क असले पाहिजे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर समाजवादी विचारवंत पन्नालाल भाऊ सुराणा हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.आर.आर. सोनकांबळे(पुणे), डॉ.मिलिंद वाकोडे (पुणे), अँड. मैना (तृप्ती) भोसले / वडणे (धाराशिव)आदी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवराच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून सामुदायिक रित्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून पुरस्कार प्राप्त मान्यवर व्यक्तीना राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवर्तन सामाजिक संस्थेचे चिवव मारुती बनसोडे यानी केले तर सुत्रसंचलन भैरवनाथ कानडे यानी केले व आभार प्रदर्शन संस्थाअध्यक्ष बाबासाहेब वडवे यानी केले.

यावेळी जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, लिंबराज सुरवसे गुरुजी, चंद्रकात शिंदे, संस्थेच्या संचालिका रेष्मा ताई बनसोडे, अंकुश लोखंडे, प्रबोध काबळे, एस.के. गायकवाड, दयानंद काळुके, अरुण लोखंडे, आरविंद लोखंडे, धर्मराज देडे, महादेव मोरे, विलास वकिलसह महिला कार्यकर्ते मोठ्या सख्येने उपस्थित होते.

## निवृत्त आयएएस अधिकारी चंद्रकांत दळवी यांची उपस्थिती

## पीएच. डी. धारक, विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार

# बार्शीच्या डॉ. कर्मवीर जगदाळे (मामा) जयंती महोत्सवानिमित्त संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त आदर्श कर्मचाऱ्यांचा पुरस्कार प्राप्त सत्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक संवर्धन व प्रेरणा स्तोत्र कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंती महोत्सवानिमित्त संस्थेच्या वतीने सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सातारा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन तथा निवृत्त आयएएस अधिकारी चंद्रकांत दळवी हे होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि निवृत्त आहेस अधिकारी दिनकरराव जगदाळे होते. यावेळी व्यासपीठावर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर डी वाय यादव उपाध्यक्ष नंदन जी जगदाळे जनरल सेक्रेटरी पाटील सहसचिव एपी देवळवार खजिनदार जयकुमार शितोळे राजेंद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते.





प्रमुख पाहुणे सातारा रयत शिक्षण चौथी चेअरमन तथा निवृत्त आयएएस अधिकारी चंद्रकांत दळवी यांनी प्रेरणादायी विचार मांडले. ते म्हणाले दोन्ही कर्मेरांच्या अण्णा व मामा यांना नावातच फक्त फरक असून कार्यात साम्य आहे मामाचे शैक्षणिक कार्य अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत निर्माण झाले आहे यातूनच संस्थेची उभारणी करण्यात आली आहे मामा हे दूरदृष्टीचे शिक्षण महर्षी होते. आजच्या शैक्षणिक धोरणाचा पाया असलेल्या कौशल्य विकास शिक्षणाची सुरुवात मामांनी फार पूर्वीच आपल्या संकेत केली होती ग्रामविकास व संस्थेचे काम आहे सत्व फाउंडेशन या माध्यमातून ग्रामीण भागातील विकास साधला जात आहे शिक्षण संस्था हा ग्रामविकासाचा खराब पाया आहे सेवानिवृत्तीनंतर पुन्हा एकदा कामाची सुरुवात करण्याचा आजचा दिवस आहे सामाजिक कार्यात सक्रिय राह असा सल्ला त्यांनी सेवानिवृत्त त्यांना दिला व विद्यार्थ्यांनी गांभीर्याने शिक्षण घेण्याची गरज आहे जास्त वेळ अभ्यास व श्रम करण्याचे विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात सलग दहा ते बारा तास विशिष्ट कार्यात गुंतवून राहा व कॉलेज जीवनात आव्हानंतर वाचन करा थोर व्यक्तींची चरित्र वाचन करा भाषण कला जोपास हा व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करा स्पोकन इंग्लिश वर भर द्या विद्यार्थ्यांना स्वची ओळख करून द्या व शिक्षण क्षेत्र वेगाने बदलत आहे प्रचलित आव्हाने सामोर जाण्याची गरज आहे डिजिटल गरज शिक्षण गरजेचे आहे सध्याची शिक्षण पद्धती बदल आवश्यक आहे इंटर एक्झिट पॅनलच्या वर्ग अध्यापनात वापर करा व कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्य विकास प्रवेश परीक्षा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे असेही आव्हान त्यांनी केले.

अध्यक्ष भाषणात निवृत्त आयएएस अधिकारी दिनकरराव जगदाळे यांनी मौलिक मार्गदर्शन केले ते म्हणाले की संस्थेचे विद्यार्थी असल्यास आम्हाला अभिमान आहे मामांच्या बोर्डिंग मधूनच संस्काराचे व जीवनाचे खरे धडे मिळाले स्वतःच्या मुलांना जसे घडवतात तसे अनुभव देणारा व्यक्ती म्हणजे शिक्षक होय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या ज्ञानाचा अनुभवाचा पुढच्या पिढीला फायदा व्हावा असे मार्गदर्शन करावे असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी संस्थेतील ती सेवानिवृत्तांचा सहा पीएचडी धारकांचा, ०५ पाच शिक्षक व २० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच तीन गुणवंत शाळांचा सत्कार हे करण्यात आला यात मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा जनता विद्यालय येडशी धाराशिव जिल्ह्यात प्रथम महाराष्ट्र विद्यालय बार्शी पुणे विभागीय तृतीय छत्रपती शिवाजी विद्यालय वाशी तालुका प्रथम सांभेश आहे.

या कार्यक्रमात महाराष्ट्र विद्यालयाची सहशिक्षक शेतात लांडगे यांनी तयार केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज कर्मवीर डॉक्टर बाबासाहेब जगदाळे यांच्यातील चित्राचे अनावर व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आली. कार्यक्रमाची प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी केले,

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा परिचय अनुक्रमे प्राचार्य डॉक्टर एस एस गोरे, प्राचार्य डॉक्टर एस बी कारंडे यांनी करून दिले व कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर अबोली सुलाखे विद्यार्थ्यांच्या स्वागतावर गुरु गीताने झाली उपस्थितांचे आभार डॉक्टर शिखरे यांनी मान्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर रविकांत शिंदे व डॉक्टर आसावरी फरताडे यांनी केले या कार्यक्रमात संस्थेतील सर्व पदाधिकारी कार्यकारणी सदस्य विश्वस्त प्राचार्य शाखाप्रमुख सत्कारमूर्ती शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### सेवानिवृत्त शिक्षकाच्या फोन पे वरून परस्पर रक्कम पाठवल्याप्रकरणी महिलेवर गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : सेवानिवृत्त शिक्षकाच्या फोन पे वरून परस्पर रक्कम पाठवल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ ते ३ मे २०२४ दरम्यान या कालावधीमध्ये लक्ष्मी हाईट्स जगदंबा नगर जुळे सोलापूर येथे घडली.याप्रकरणी तनवीर यासीन सय्यद (वय-४३,रा.सुविधा टॉवर,पूजा नगर रोड,मिरा रोड,मुंबई) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून श्रद्धा मंगेश मलखरे (रा.लक्ष्मी हाईट्स,जगदंबा नगर,जुळे सोलापूर) हिच्याविरुद्ध दि.३ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,दि.१९ मार्च २०२४ पासून फिर्यादी यांचे मयत वडील हे वरील संशयित आरोपी हिच्या घरी राहत होते.दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी फिर्यादी यांच्या वडिलांची अचानक तब्येत खराब होऊन मयत झाले.फिर्यादी यांच्या वडील वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकवरून तीन लाख रुपये फिर्यादीस तसेच फिर्यादीच्या आईस न सांगता श्रद्धा हिने स्वतःच्या फायद्याकरिता फिर्यादीच्या परवानगीशिवाय पैसे घेतले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास दुमपोनि.पाटील या करीत आहेत.

### 'दिल्ली'साठी आज मतदान

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभेसाठी बुधवारी मतदान होत आहे. सत्तारूढ आम आदमी पक्ष (आप) विरोधात भारतीय जनता पक्ष तसेच काँग्रेस असा तिरंगी सामना होईल. राजधानीत एकूण एक कोटी ५६ लाख मतदार आहेत. मतटक्का वाढविण्यासाठी विविध व्यावसायिकांनी सवलती जाहीर केल्या आहेत. अरविंद केजरीवाल यांचा 'आप' सलग तिसऱ्यांदा सत्तेत येण्याच्या प्रयत्नशील आहे. भाजपने यंदा जोरदार प्रचारमोहीम राबवली. दिल्लीत २६ वर्षांनंतर सत्तेत येण्याची त्यांना आशा आहे. काँग्रेसने तगडी लढत दिली असून, गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत एकही जागा जिंकता आलेली नाही.

# राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमाला जोडे मारो आंदोलन

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन






**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवाजी छत्रपती महाराजांच्या बाबत मराठी अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामर्थ्यांची आणि कर्तुत्वाची अवमूल्य केल्यामुळे राहुल सोलापूरकर यांनी तशी पुरावे द्यावे अन्यथा त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आले आहे.

बुद्धी चातुर्य, धैर्य, गनिमी कावा, अशा विविध गुणांनी त्यांनी लढवलेले डावपेच यांनी इतिहासात महत्त्वाचे स्थान मिळवला आहे यापैकी जे घटना म्हणजे शिवाजी छत्रपती महाराजांची आग्र्याहून सुटका झाली होती छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड महाराष्ट्रासह देशभरात आपले कर्तृत्व आणि सामर्थ्याची गाथा पोचवणारा पोचवणारे असल्यामुळे अनेकांचे प्रेरणास्थानी आहेत.

जगप्रसिद्ध आग्र्याच्या सुटकेच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज लाज देऊन आगऱ्याहून सुटून आले होते यासाठी त्यांनी कितीतरी हुंडी वाटले त्यांनी औरंगजेबाच्या वजीरासह त्यांच्या बायकोला लाज दिली मोहसीन खान नावाच्या सरदाराकडून सही शिका असणारे अधिकृत पत्र त्यांनी घेतल्याचे त्यांच्याबरोबर हिरकणी ही एक कथा असून हिरकणीची घटना घडलेलीच नाही महाराजांच्या शिस्तीचा मोठेपणा म्हणून ही गोष्ट रचलेली आहे असे एका मुलाखतीत वक्तव्य करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयदत्त पराक्रमी इतिहास चुकीच्या पद्धतीने सांगून त्यांची कर्तबगारी कर्तुत्व व पराक्रम कमी करण्याचा प्रयत्न या राहुल सोलापूरकरांनी केलेला आहे.

त्यामुळे यांच्यासह तमाम शिवशंभू प्रेमीच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे कार्याध्यक्ष अरविंद शेळके संपर्कप्रमुख शत्रुघन माने उपाध्यक्ष सिताराम बाबर फिरोज सय्यद दिलीप निंबाळकर लखन गायकवाड आकाश नायकवडी वैभव धुमाळ ज्ञानेश्वर कदम आदी उपस्थित होते.

# निफाड नगरपंचायतीने वाढीव कर आकारणीची सुरु असलेली कार्यवाही तात्काळ थांबवली

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नगरपंचायत, सभागृहात आज नगराध्यक्षा . कविता धारराव व उपनगराध्यक्ष अनिल कुंदे यांचे अध्यक्षतेखाली सर्व साधारण सभा आयोजित करणेत आलेली होती. सभेवर शहराच्या विविध विकास कामांबाबत, योजनांबाबतच्या विषयांवर चर्चा करणेत आली. त्यातील प्रमुख विषय निफाड शहरात सुरु असलेल्या चतुर्थ कर वार्षिक कर आकारणी बाबत उपस्थित नगरसेविका, नगरसेवक तथा निफाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व संबधीत अधिकारी कर्मचारी उपस्थित होते यावेळी निफाड नगरपंचायतीने वाढीव कर आकारणीची सुरु असलेली कार्यवाही तात्काळ थांबवली असल्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आल्याची माहिती उपनगराध्यक्ष आनिल कुंदेयांनी पत्रकार परीषदेत दिली.

नगर पंचायत हद्दीततील मालमत्ता धारकांना कर आकारणी बाबत महाराष्ट्र नगरपरिषदा व औद्यागिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ अन्वये कर आकारणी बाबत आक्षेप दाखल करणेसाठी नोटीस देणेत आली होती त्यानुसार या कार्यालयाकडे हरकती आक्षेप सुचना प्राप्त होत आहे. वाटप झालेल्या नोटिसा मध्ये मोठ्या प्रमाणत तांत्रिक चुका मुळे मोठ्या प्रमानात कर आकरणीचे आकडया मध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. सदर सुरू असलेली कर आकारणीची फेर आकारणी करून झोन दुरुस्ती करणे या कामी अजून मोठा अवधी लागणार असल्याने आजच्या सभेने कर आकारणीची सुरु असलेली कार्यवाही तात्काळ थांबवून सभेत सर्वानुमते पुढील निर्णय घेण्यात आला की सदर सुरु असलेल्या कर आकारणीमधून शिक्षण कर, वृक्ष कर व रोजगार हमी कर हा निफाड शहरातील कुठल्याच मालमत्तेस आकारण्यात येऊ नये व याकामी सूट मिळणेकरिता परीपूर्ण प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात यावा व जो पर्यंत सदर प्रस्ताव मंजूर होत नाही तोपर्यत सद्यस्थितीतील सुरु असलेली ग्रामपंचायत कालीन कर आकारणी नियमित सुरु असेल. सुरु असलेल्या कर आकारणी मध्ये फेर आकारणी करून सुधारित कर आकारणी करून झालेल्या चुका दुरुस्त करून नवीन झोन तयार करणेत येईल व सर्व सुधारित योग्य ती कर आकारणी करून नगर रचना विभागाची परवानगी घेऊन रीतसर कर वाढ लागू करणेत येईल तरी सर्व निफाडवासियांना आव्हान करणेत येते की नवीन कर वाढीबाबत आपण कुठल्याही शंका बाळगु नये. नगरपंचायतीचे आणि नागरिकांचे नुकसान होणार नाही यासाठी सर्व सन्मानीय सदस्य व प्रशासन बांधील असणार असून आपण नियमित घरपट्टी व पाणीपट्टी भरून नगरपंचायतीस सहकार्य करावे. सदर सभेसाठी नगराध्याक्षा डॉ. कविता नितीन धारराव, उपाध्यक्ष अनिल कुंदे, नगरसेविका . रत्नमाला कापसे, . शारदा कापसे, सौ. रुपाली रंधवे, सुलोचना होळकर, अरुंधती पवार, . अल्का निकम, . नयना निकाळे, नगरसेवक किशोर ढेपले, साहेबराव बर्डे, सागर कुंदे, जावेद हसन शेख, किरण कापसे, संदीप शिंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी व सर्व अधिकारी कर्मचारी निफाड नगरपंचायत उपस्थित होते.

# वाहनात झोपी गेल्यावर अज्ञात चोरट्याने मोबाईल पळवला

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) पिकअप वाहन मध्ये फिर्यादी ज्ञानेश्वर बालाजी नवले (वय-२६,मु.पो.जागजी,जिल्हा धाराशिव यांचा भाऊ गोरबा हा झोपी गेला असता, त्यावेळी अज्ञात चोरट्याने १८ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २१ डिसेंबर २०२३ रोजी मार्केट यार्ड येथे घडली.

याप्रकरणी ज्ञानेश्वर नवले यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून १ फेब्रुवारी २०२५ रोजी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल धुमाळ हे करीत आहे.

तसेच दुसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि.१२ ऑक्टोंबर २०२४ रोजी फिर्यादी बलराम सुकलाल रावत (वय-३२,रा.मध्य प्रदेश) हे मार्केट यार्ड गेट समोर धान्याने भरलेली ट्रक पार्क करून झोपी गेलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे.

याप्रकरणी रावत यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल आरेनवरु हे करीत आहेत.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत च्या वतीने महिला सफाई कर्मचारी यांचे समवेत रथसप्तमीचे औचित्य साधून हळदी कुंकवाचा कार्यक्रम नगरपंचायत च्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता,

निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. कविता धारराव तसेच नगरसेविका शारदा कापसे, सुलोचना होळकर ,नयना निकाळे ,तसेच अभियंता भाग्यश्री सोनवणे यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला होता ,



महिलांनी हळदीकुंकू समारंभात एकमेकींना हळदीकुंकू लावणे म्हणजे समोरच्या सुवासिनींच्या रूपातील आदिशक्तीला शरण जाऊन तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे होय, यावेळी निफाड नगरपंचायत च्या वतीने सुहासिनींच्या बरोबरच विधवा महिलांनाही हळदीकुंकू देऊन त्यांच्या प्रति आदरभाव व्यक्त करुन त्यांचा सन्मान केला, कारण हळदीकुंकू लावले जाते त्यावेळी साक्षात आदिशक्तीचे रूप हे जागृत होते विधवा किंवा सुवासिन असा कुठलाही भेदभाव न करता सर्व महिलांना आदिशक्तीचेच रूप समजावे असा सुंदर संदेश यावेळी देण्यात आला, याप्रसंगी नगरपंचायत च्या वतीने प्रत्येक महिला सफाई कर्मचारी यांना एक स्टीलचे भांडे भेट देण्यात आले. याप्रसंगी निफाड नगरपंचायतीच्या सर्व महिला सफाई कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या,

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास २ लाख ५१ हजाराची देणगी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस मंगला मारूती पाटील राहणार ठाणे यांनी २ लाख ५१ हजार रूपयांची देणगी धनादेश स्वरूपात दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदरची देणगी देणगीदार यांचे पती मारूती पाटील यांनी आज श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात उपस्थित राहून दिली आहे. त्याबद्दल देणगीदार भाविकांस श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांनी सन्मान केला. पाटील कुटुंब हे श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. मंगला पाटील यांची श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी देणगी अर्पण करण्याची इच्छा होती. परंतू त्यांना काही कारणास्तव उपस्थित राहता आले नाही. मात्र, त्यांनी श्रींच्या चरणी देणगी अर्पण करून आपली इच्छा पूर्ण केली आहे. तसेच श्री विठ्ठल मंदिर बघवाडा, गुजरात यांचेकडून देखील ऑनलाईन पध्दतीने १ लक्ष रूपयांची देणगी प्राप्त झाली आहे.



सद्यस्थितीत, माघ यात्रेचा कालावधी सुरू झाला आहे. त्यामुळे भाविकांकडून देणगी प्राप्त करून घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची मदत घेण्यात येणार असून, जादा स्टॉल उभारण्यात करण्यात येत आहे. याशिवाय, ऑनलाईन देणगीसाठी आरटीजीएस, क्यूआर कोड, संकेतस्थळ व मोबाईल पची देखील सुविधा आहे. इच्छुक भाविकांना देणगी द्यावयाची असल्यास, त्यांनी श्री संत तुकाराम भवन येथील देणगी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने यावेळी श्री श्रोत्री यांनी केले.

## स्वेरीज् डी. फार्मसीमध्ये पालक मेळावा संपन्न

## दादासाहेब नागटिळक यांचे प्रतिपादन

# गुणवत्ता आणि शिस्त या सूत्रांवर स्वेरी भक्कमपणे उभी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'स्वेरीमध्ये विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक असणार्या सर्व बाबी उपलब्ध आहेत. त्यामुळे स्वेरीत जे उपक्रम सुरु आहेत ते सर्वोत्तम आहेत. ट्रिपल पी.ई., विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे व बौद्धिक पातळीकडे स्वेरीतील प्रत्येक स्टाफचे लक्ष, काटेकोर शिक्षण व्यवस्था, अभ्यासक्रमाचे उत्तम नियोजन, प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष या कारणांमुळे आमच्या पाल्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडत आहे. एकूणच गुणवत्ता आणि शिस्त या सूत्रांवर स्वेरी भक्कमपणे उभी आहे.' असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब नागटिळक यांनी केले.




गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित डिप्लोमा फार्मसीमध्ये प्रथम आणि द्वितीय वर्ष फार्मसीतील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात अध्यक्ष स्थानावरून दादासाहेब नागटिळक आपला अनुभव सांगत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वेरी संचलित डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे यांच्या नेतृत्वाखाली या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून दिनकर भोसले तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.राणी लक्ष्मण पिसे हया उपस्थित होत्या. दिपप्रज्वलनानंतर प्रास्तविकात प्रा. सौरभ कौलगी यांनी डी.फार्मसीची सविस्तर माहिती दिली. यामध्ये महाविद्यालयात उपलब्ध सोयी-सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, रात्र अभ्यासिका वर्ग, तसेच शिक्षणासाठी संबंधित महत्वाच्या बाबी सांगितल्या. सोलार रुफ टॉप पॉवर प्लांट, प्ले ग्राउंड, जिमखाना, वाचनालयात उपलब्ध असलेली अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेसाठी संदर्भ पुस्तके, वसतिगृहातील सुविधा, वाहतुकीसाठी बस सुविधा, वाय-फाय इंटरनेट सुविधा, फीडबॅक सिस्टम तसेच औषधांची निर्मिती कशी होते हे पाहण्यासाठी थेट इंडस्ट्रीयल व्हिजीट आदी फार्मसीशी निगडीत आवश्यक सुविधांची सविस्तर माहिती दिली. महिला पालक प्रतिनिधी सौ. राणी पिसे म्हणाल्या की, 'स्वेरीमध्ये सर्व अभ्यास करून घेतला जातो. यामुळे अभ्यासासाठी इतरत्र जावे लागत नाही. त्यामुळे 'अभ्यास कर गं बाई !' असे आमच्या मुलींना म्हणावे लागत नाही. त्यामुळे आमचे पाल्य टॉपर होत आहेत.' यावेळी दिनकर भोसले, सौ. गुरव यांच्यासह इतर पालकांनी आपले मनोगत मांडले. प्राचार्य प्रा. मांडवे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालकांची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे पालकांनी पाल्याच्या करिअरच्या दृष्टीने महाविद्यालयाला वेळोवेळी सहकार्य करावे. आपला पाल्य कॉलेजमध्ये नियमित येतो का, त्याचा अभ्यासक्रम कसा आहे, या सर्व बाबी पालकांनी कॉलेजमध्ये प्रत्यक्ष येऊन संबंधित शिक्षकांशी भेटून आपल्या पाल्यांच्या उज्वल करिअर विषयी माहिती जाणून घ्यावी.' असे आवाहन केले. यावेळी काही पालकांनी बस वाहतूक व मेस याविषयी सूचना केल्या असता प्राचार्य प्रा.मांडवे यांनी काही सूचना जागेवरच सोडवल्या तर काही वरिष्ठ पातळीवर सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी अश्विनी नवनाथ बनसोडे, प्रथमेश अरुण घोलप, पल्लवी बजरंग हेगडे, महेक सलीम शेख, दिव्या सुभाष पवार, रोहिणी जगन्नाथ शिंदे, तन्वी जालिंदर फुगे, संतोष दशरथ पिसे, अभिषेक सुभाष चौगुले, सानिया जावेद मुजावर, प्राजक्ता एकनाथ माळी, शुभम बिराप्पा हिप्परकर, सानिका संजयकुमार गुरव, साक्षी उमाकांत झेंड, स्वाती उमेश काळे, प्रतिक्षा गणपत घोडके, सुमन नागनाथ खरे, शगुन महेश ओहोळ, निशा सतीश पुजारी, प्रणिता सुरेश खरात, भाग्यश्री बब्रुवान यादव, समृद्धी सतीश दीक्षित व प्रतिभा दिलीप मिसाळ या गुणवंत विद्यार्थ्यांचा परीक्षेत, प्रश्नमंजुषा, रांगोळी, वकृत्व, मॉडेल मेकींग, प्रोडक्ट डिटेलिंग अशा विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरल्यामुळे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यातील सुमारे ३०० पालक मेळाव्यात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपाली चव्हाण यांनी केले तर प्रा. ईशा शेटे यांनी आभार मानले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मोठी खेळी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सरकार आणि संघटनेत समन्वयासाठी भाजपकडून विशेष नियुक्ती करण्यात आलेले आहेत. भाजपचा पालकमंत्री नसलेल्या जिल्ह्यात संपर्क मंत्री काम करणार आहेत.



पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये तीव्र संघर्ष सुरू असताना संपर्कप्रमुख हे नवे पद भाजपने निर्माण केलेले आहे. संपर्कप्रमुख हे नवे पद भाजपने निर्माण केलेले आहे संपर्क मंत्री म्हणून अप्रत्यक्षपणे मित्र पक्षाच्या पालकमंत्र्यावर धाक राहावा, यासाठी भाजपने मोठी चाल खेळण्याची चर्चा आहे, तसेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादीला हा शह देण्याचाही भाजपचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री पद आपल्यालाच मिळावे असा राजकीय नेत्यांचे प्रयत्न असतो सरकार स्थापन झाल्याने झाल्यानंतर असे मंत्री पदासाठी आणि चांगल्या खात्यासाठी असे प्रयत्न झाले तसेच स्व जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळावे यासाठी नेत्यांनी पराकोटीचे प्रयत्न केले, परंतु तरीही तिन्ही पक्षातले काही नेते नाराज झाले आहेत. भाजपमधील नाराजी शमविण्यासाठी आणि पक्षातील कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांच्या कामासाठी भाजपने संपर्क मंत्री हे नवे पद निर्माण केल्याचे सांगितले जात आहे.